महाराष्ट्र वन विभाग

**उपवनसंरक्षक, जव्हार वनविभाग, जव्हार यांचे कार्यालय**
राजीव गांधी स्टेडीयम जवळ, जव्हार, जि. पालघर 401603
दुरध्वनी क्रमांक 02520-222252
ई-मेल: dycfjawhar@mahaforest.gov.in, dycfjawhar@gmail.com

जा.क्र.ब/12/आस्था/न्या.प्र. / ९८१ /सन 2026-27 दिनांक 02 / 06 / 2026

आदेश

विषय: O.A. 1490/2024 मॅट मुंबई
संकीर्ण अर्ज क्रमांक 598/2025
श्री. कोरनुळे मनमत शिवाजी, वनरक्षक
विरुध्द
महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ: मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचे कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-7(1)/12/आस्था/ जा.182 सन 2026-27, दि. 27.05.2026

विषयांकीत प्रकरणी श्री. कोरनुळे मनमत शिवाजी, वनरक्षक फिरते पथक वाडा, वनक्षेत्र पश्चिम वाडा, वनविभाग जव्हार यांनी त्यांच्या बदली संदर्भात मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे विषयाधीन मुळ अर्ज तसेच, Misc App संकीर्ण अर्ज क्र.598/2025 मा. न्यायाधिकरणाकडे दाखल केला आहे.

2.00 मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार उपरोक्त संदर्भान्वये श्री. मनमत शिवाजी कोरनुळे, वनरक्षक यांची खालीलप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे पुर्ण नाव | पदनाम व कार्यरत ठिकाण | मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार बदली व पदस्थापनेचे पद | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | श्री. मनमत शिवाजी कोरनुळे | वनरक्षक, शिरोषी वनपरिक्षेत्र दक्षिण जव्हार | वनरक्षक वनोपज तपासणी नाका, मुरबाड, वनपरिक्षेत्र मुरबाड पश्चिम, वनविभाग ठाणे | मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थगित असलेल्या पदावर |

3.00 वनक्षेत्रपाल, दक्षिण जव्हार यांनी कोणतीही सबब पुढे न करता स्थानिक व्यवस्था करून वरीलप्रमाणे कर्मचारी यांना त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होणेकरीता तात्काळ कार्यमुक्त करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

4.00 सदरच्या बदल्यांचे आदेश निर्गमित केल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियमानुसार दिलेल्या पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी रुजु होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजु न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (Dies non) म्हणुन गणला जाईल, याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.



Scanned with CamScanner

5.00 सबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होईपर्यंत कोणत्याही कारणास्तव रजा मंजुर करू नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मधीन नियम-30 (सी) नुसार मुळ कार्यालयाने बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नये. मुळ कार्यालयाने असे अर्ज प्राप्त झाल्यास, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे रजेचे अर्जाची दखल न घेता, सदरचे अर्ज संबंधित कर्मचाऱ्यास नोंदणी पोहच देय डाकेने परत करावेत.

6.00 तसेच कार्यमुक्त होणाऱ्या वनरक्षक यांनी त्यांचेकडील कार्यभार देताना / घेताना संपुर्ण नियतक्षेत्राचा कार्यभार पुर्णपणे व सविस्तर हस्तांतरीत करावयाचा आहे. त्याचप्रमाणे कार्यभार देणार/घेणार यांनी तसे समजावून देणे/घेणेचा आहे. कार्यभार हस्तांतरणाबाबत सविस्तर टिपणी, पंचनामा व कार्यभार यादी तयार करून त्यावर सबंधित कार्यभार देणार/घेणार यांच्या सह्या असतील. सविस्तर कार्यभार हस्तांतर झाल्याबाबत वनपाल व वनक्षेत्रपाल यांनी खात्री करून घ्यावी.

7.00 सदर आदेशान्वये बदली पदस्थापना करण्यांत आलले कर्मचारी कार्यमुक्त किंवा पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झालेस वा राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास सदर कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक), नियम 1979 मधील नियम 23 चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधितांविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई तात्काळ करण्यांत येईल यांची त्यांना समज द्यावी.

प्रस्तुत आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी व तसा अहवाल सादर करावा.

(डॉ. सैपुन शेख)
उप वनसंरक्षक
जव्हार वनविभाग जव्हार

प्रति,
वनक्षेत्रपाल, दक्षिण जव्हार

प्रतिलिपी : सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव) वाडा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता रवाना.

2/- त्यांनी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मा. न्यायालयाचे निदर्शनास आणुन द्यावी व अनुपालन अहवाल वेळीच या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलिपी : (1) विभागीय कार्यालय वेतन कक्ष (2) सेवापुस्तक (3) सबंधित उपकोषागार अधिकारी

प्रत : मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत :उपवनसंरक्षक, ठाणे वनविभाग, ठाणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित.

प्रत : सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा) जव्हार यांना माहितीकरीता रवाना.

सही/-
(डॉ. सैपुन शेख)
उप वनसंरक्षक
जव्हार वनविभाग जव्हार

03/06/2026
कार्यमुक्त च्या आदेश
द्वारे श्री. 2गुरुडे यांच्याकडे
अतिरिक्त कार्यभार
द्यावे

E:\आस्थापना\न्यायालयीन प्रकरणे\पत्र.docx

Scanned with CamScanner